सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४५ | गुरुवार, दि. २८ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४००००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६४००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६००/-
भाव प्रती १० ग्राम

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## दिनविशेष
२८ मे

- स्वातंत्र्यसैनिक सावरकर यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त मुंबई महापालिकेतर्फे सत्कार करण्यात आला.

## ॲड. प्रदीप भट यांचे निधन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रदीप भट (वय ६०) यांचे बुधवार, दि. २७ मे रोजी बेंगळुरू येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून असा परिवार आहे. अत्यंत अभ्यासू, शांत, विनम्र व्यक्तिमत्त्वाचे ॲड. भट सर्वत्र लोकप्रिय होते. त्यांच्या अकाली निधनाचा केवळ त्यांच्या पक्षकारांनाच नव्हे, तर समस्त न्यायालय परिवार व मित्र परिवाराला मोठा धक्का बसला आहे. त्यांच्यावर गुरुवार, दि. २८ मे रोजी सायंकाळी उशिरा अमळनेर येथे अत्यंसंस्कार होतील



अमळनेर : पालिकेचा १६३ वा वर्धापनदिन साजरा करण्यापूर्वी बुधवार, दि.२७ मे रोजी पालिका इमारतीबाहेरील राजस्व स्तंभाला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्याप्रसंगी उपस्थित नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, पाणीपुरवठा समिती सभापती कैलास पाटील, गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक मोहन सातपुते, डॉ. डिगंबर महाले, विजय कहारू पाटील, नाविद शेख, प्रताप साळी, मुख्याधिकारी गणेश शिंदे आदी. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# पालिकेचा १६३ वा वर्धापन दिन उत्साही वातावरणात साजरा, इतिहासात प्रथमच साजरीकरण

## पुढील वर्षापासून भव्यदिव्य स्वरूपात आठवडाभर आयोजनाचा केला सर्वांनी संकल्प

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेचा १६३ वा वर्धापन दिन आज बुधवार, दि. २७ मे रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पालिकेत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. इतिहासात प्रथमच पालिकेचा वर्धापन दिन साजरा झाला, हे विशेष! नगराध्यक्ष, नगरसेवक, विविध समित्यांचे पदाधिकारी, मुख्याधिकाऱ्यांसह सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाचा हा अभिनव उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात सकारात्मकरित्या राबविण्यात आल्याने त्याची शहरासह तालुक्यात चर्चा आहे.

प्रारंभी पालिकेच्या इमारतीबाहेरील महसूल विभागाच्या योगदानाचे व ऐतिहासिकतेचे प्रतीक म्हणून उभारण्यात आलेल्या राजस्व स्तंभाला नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक मोहन सातपुते, डॉ. डिगंबर महाले, विजय कहारू पाटील, नाविद शेख, पाणीपुरवठा समिती सभापती कैलास पाटील, प्रताप साळी, मुख्याधिकारी गणेश शिंदे आदींनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. त्यानंतर पालिकेच्या सभागृहात शुभेच्छापर कार्यक्रम झाला.

यावेळी पाणीपुरवठा समिती सभापती कैलास पाटील, नगरसेवक महेश देशमुख, प्रताप साळी, राजू फापोरेकर, दादा पवार, श्रीराम चौधरी, दीपक चौगुले, रामकृष्ण पाटील, विजय कहारू पाटील, सचिन पाटील, बाळासाहेब पाटील (पैलाड), बाळासाहेब संदानशिव, जालंधर चौधरी, उपमुख्याधिकारी चव्हाण, अकाऊंटंट सुदर्शन सैंदाणे, पालिकेचे स्वच्छता निरीक्षक किरण कंडारे, संतोष जाधव, संतोष माणिक, विद्युत अभियंता कुणाल महाले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते सचिन गवांदे आदी उपस्थित होते. प्रा. भरतसिंह परदेशी यांनीही अंकशास्त्रांचे संदर्भ देऊन वर्धापन दिन साजरा करण्यात महत्त्व याप्रसंगी सांगितले. पालिका कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सोमचंद संदानशिव यांनी सूत्रसंचालन केले.



वर्धापन दिनानिमित्त पालिका सभागृहात शुभेच्छापर कार्यक्रमाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना विविध पदाधिकारी.


### पालिकेवरील कर्जाचा भार कमी करू



***आगामी काळात पालिकेवरील आर्थिक व प्रशासकीय भार कशाप्रकारे कमी करता येईल, यावर विशेष भर दिला जाईल. स्वच्छ व सुंदर शहर हा आपला संकल्प आहे. शहरातील रस्त्यांची व्यवस्था चांगली असणे आवश्यक आहे. शहर पूर्णपणे हरित कसे करता येईल, यासाठीही प्रयत्न केले जातील. भूमी सुपोषण अभियान या राष्ट्रीय चळवळीची सुरूवात मंगळग्रह सेवा संस्थेच्या माध्यमातून झालीच आहे. तसेच शहरातील आरोग्य सुविधांबाबतही लवकरच सुधारणा करण्यात येणार आहेत. पालिकेचा वर्धापन दिन आहे की नाही याची माहिती नव्हती. मात्र, बातम्यांच्या माध्यमातून याची माहिती मिळाली. त्यानंतर याबाबत माहिती घेऊन वर्धापन दिन साजरा करण्यात आला.***

*– डॉ. परिक्षीत बाविस्कर, नगराध्यक्ष.*

### 'अमळनेर पॅटर्न'चा बोलबाला व्हावा



आतापर्यंत एकदाही पालिकेचा वर्धापन दिन साजरा झाल्याचे ऐकिवात नाही. ज्यांनी वर्धापन दिन साजरे केले नाहीत त्यांच्यावर कोणीही टीका केली नाही. या पार्श्वभूमीवर आज नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर यांच्यावर निष्कारण टीका करणे पूर्णतः चुकीचे आहे. पुढील वर्षापासून सर्व शहरवासीयांना सोबत घेऊन राज्यातच नव्हे, तर देशातही 'अमळनेर पॅटर्न'प्रमाणे कार्यक्रम होतील, अशा पद्धतीने आठवडाभर वर्धापन दिन सप्ताह साजरा करू. जनगणना कर्मचाऱ्यांना सर्व नागरिकांनी सहकार्य करावे. त्यासाठी सर्व नगरसेवकांनी आपापल्या वॉर्डातील नागरिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे.

**– डॉ. डिगंबर महाले, नगरसेवक.**

### एकदिलाने काम करू



अमळनेर पालिका भरीव उत्पन्न देणारी होती. मात्र, सद्यःस्थितीत ती मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाली आहे. आगामी काळात कर्जमुक्तीचा प्रयत्न केला जाईल. मग तो राजकारणाच्या पलीकडे जाऊन का असेना. सत्ताधारी असोत किंवा विरोधक सर्व नगरसेवकांनी कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करू.

**– पंकज चौधरी, गटनेते.**

### वर्धापन दिनाची परंपरा कायम राहावी



जळगाव जिल्ह्यातील सर्वांत जुनी ब्रिटीशकालीन पालिका म्हणून पूर्वी ओळखली जात होती. त्या काळात पालिका व्यवस्था अतिशय उत्तम होती. नगरसेवकांची संख्याही ४० पेक्षा अधिक होती. मात्र, सध्याच्या काळात ती कमी झाली असून, परिसरही लहान झाला आहे. आता नवीन इमारत उभी आहे. आजच्या वर्धापन दिनाची आठवण ज्यांना-ज्यांना झाली त्या सर्वांचे मी आभार मानतो. ही परंपरा दरवर्षी अशीच सुरू राहावी, ही अपेक्षा.

**– चंद्रकांत ऊर्फ मुन्ना शर्मा, माजी नगरसेवक.**

### दर्जेदार सेवा देण्यासाठी कटिबद्ध



मागील काळात आपल्याकडून झालेल्या चुका लक्षात घेऊन येणाऱ्या काळात आपण अधिक जबाबदारीने काम केले पाहिजे. गेल्या १६३ वर्षांच्या काळात ब्रिटीश काळापासून आतापर्यंत अमळनेर पालिकेने नागरिकांना विविध सुविधा दिल्या आहेत. अमळनेर पालिका ही जळगाव जिल्ह्यातील एक सक्षम आणि आदर्शवत पालिका म्हणून ओळखली जाते. पुढील काळातही पालिकेच्या माध्यमातून नागरिकांना अधिक दर्जेदार व प्रभावी सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहील. या वर्धापन दिनानिमित्त आपण सर्वांनी विकासाचा संकल्प करावा.

**– गणेश शिंदे, मुख्याधिकारी.**

# 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत विकासकामांचा घेतला आढावा

## खासदार स्मिताताई वाघ, पश्चिम रेल्वेचे जनरल मॅनेजर पांडे यांच्याकडून अमळनेर रेल्वेस्थानकाला भेट



***अमळनेर : येथील रेल्वेस्थानकाला खासदार श्रीमती स्मिताताई वाघ व पश्चिम रेल्वेचे जनरल मॅनेजर रामशरय पांडे यांनी बुधवार, दि. २७ मे रोजी भेट दिली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांकडून विविध कामांची माहिती घेऊन सूचना करताना स्मिताताई वाघ व श्री. पांडे.***

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील रेल्वेस्थानकाला खासदार श्रीमती स्मिताताई वाघ व पश्चिम रेल्वेचे जनरल मॅनेजर रामशरय पांडे यांनी बुधवार, दि. २७ मे रोजी भेट दिली. केंद्र शासनाच्या 'अमृत भारत स्टेशन' या योजनेंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करून अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. त्यात पंकज सिंग (डीआरएम), आदिश पठानिया (डीसीएम), हिमांशू शर्मा यांचा समावेश होता.

स्मिताताई वाघ यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू असलेल्या कामांमध्ये काही आवश्यक दुरुस्त्या करण्याची अधिकाऱ्यांना सूचना केली. तसेच प्रवाशांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी स्थानक परिसरात आवश्यक नागरी सुविधा वाढविण्याबाबत सूचना केल्या. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या नरडाणा-धुळे रेल्वेमार्गाच्या कामाबाबतही स्मिताताई वाघ यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला. धुळे आणि जळगाव रेल्वेद्वारे थेट जोडले जावे, यासाठी नरडाणा येथे रेल्वे बायपास तयार करण्यात यावा, याबाबतही त्यांनी श्री. पांडे यांच्याशी सविस्तर चर्चा करून पत्रव्यवहार केला. हा रेल्वे बायपास खानदेशासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, भविष्यात मुंबई-पुणे मार्गावरील अनेक रेल्वेगाड्या या मार्गाने चालविणे शक्य होईल. त्याचा खानदेशातील प्रवाशांना मोठा फायदा होणार असल्याचे स्मिताताई वाघ यांनी सांगितले.

यासोबतच अमळनेर रेल्वेस्थानकावर अधिक एक्सप्रेस गाड्यांना थांबा मिळावा, यासाठी रेल्वे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी श्री. पांडे यांच्याकडे केली. सध्या बंद असलेली पार्सल सेवा तत्काळ सुरू करण्यात यावी, जेणेकरून व्यापारी व नागरिकांना मोठा फायदा होईल, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी भाजप मंडल अध्यक्ष जिजाबराव पाटील, शहर मंडल अध्यक्ष योगेश महाजन, भाजप जिल्हा उपाध्यक्ष लालचंद सैनानी, खानदेश शिक्षण मंडळाचे संचालक नीरज अग्रवाल, राकेश पाटील, दीपक भोई, शिवाजी राजपूत, राहुल चौधरी तसेच रेल्वे प्रशासनाचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



***अमळनेर : अमळनेर तालुका को-ऑप. फ्रुटसेल सोसायटीमार्फत शासकीय ज्वारी, मका व भरड धान्य खरेदीचा बुधवार, दि. २७ मे रोजी शुभारंभप्रसंगी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी संस्थेचे चेअरमन भागवत पाटील, संचालक पुरुषोत्तम पाटील, सुरेश पाटील, श्यामकांत पाटील, जयेशकुमार काटे, प्रफुल्ल पाटील, हिलाल सैंदाणे, ज्ञानेश्वर धनगर, सुनील काटे आदी.***

# फ्रुटसेल सोसायटीत शासकीय ज्वारी, मका खरेदीचा आमदारांच्या हस्ते शुभारंभ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : अमळनेर तालुका को-ऑप. फ्रुटसेल सोसायटीमार्फत शासकीय ज्वारी, मका व भरड धान्य खरेदीचा बुधवार, दि. २७ मे रोजी उत्साहात शुभारंभ करण्यात आला. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

जानवे येथील शेतकरी स्वप्नील सुरेश पाटील यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर ज्वारीची मोजणी करून खरेदी प्रक्रियेस औपचारिक सुरूवात झाली. संस्थेचे चेअरमन भागवत पाटील, संचालक पुरुषोत्तम पाटील, सुरेश पाटील, श्यामकांत पाटील, जयेशकुमार काटे, प्रफुल्ल पाटील, हिलाल सैंदाणे, ज्ञानेश्वर धनगर, सुनील काटे, दिनकर पाटील, के. व्ही. पाटील, कामराज पाटील, मॅनेजर लहू पाटील व कर्मचारी वृंद तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांना हमीभावाने बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी संस्था नेहमीच कटिबद्ध असल्याचे सांगितले. तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात शासकीय धान्य खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## संपादकीय




# कर्तव्याच्या 'सक्ती'ला नमन

खासगी, विना अनुदानित व अल्पसंख्याक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जनगणनेची कामे सोपविण्यास लगाम लावण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश जनगणनेच्या वेळापत्रकावर परिणाम करू शकतो. जनगणनेचा कायदा आणि शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन खासगी शाळांमधील शिक्षकांनाही जनगणनेच्या कामांची सक्ती करण्याच्या सरकारी आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. हा आदेश सगळीकडेच लागू होणारा असल्याने देशभरातील खासगी शाळांतील शिक्षकांना दिलासा मिळेल. सरकार याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असले, तरी तेथे हाच आदेश कायम राहिल्यास या कामात अडचणी उभ्या राहू शकतात. एकीकडे शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा; तर दुसरीकडे जनगणनेचे राष्ट्रीय कर्तव्य असा हा पेच असून, दोन्ही घटकांच्या भूमिकांमध्ये काही प्रमाणात तथ्य आहे. आता वरिष्ठ पातळीवरून हा तिढा सोडवण्याची वेळ आली आहे; मात्र त्यासाठी केवळ मनमानी परिपत्रकांचा मारा किंवा शिक्षकांवर फौजदारी कारवाईचा बडगा उगारण्याची भूमिका घेण्याऐवजी सर्व बाजूंचा साकल्याने विचार करण्याची आणि सर्व घटकांना विश्वासात घेण्याची गरज आहे.

शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षकांवर अशैक्षणिक कामांची सक्ती करता येत नाही; मात्र निवडणूक आणि जनगणनेच्या कामांचा त्यात अपवाद केला आहे. जनगणनेची कामे करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारीवृंद नसल्यामुळे ही राष्ट्रीय कामे करायची कोणी, हा प्रश्न उद्भवतो. सरकारच्या वतीने हाच मुद्दा सुनावणीत मांडण्यात आला होता. मात्र, उच्च न्यायालयाने या तरतुदींच्या मर्यादा निदर्शनास आणून दिल्या आहेत. कायद्यातील या तरतुदी सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी किंवा सरकारी-अनुदानित शाळांमधील शिक्षकांनाच लागू होतात; खासगी आणि विना अनुदानित शाळा या 'स्थानिक प्रशासना'च्या व्याख्येत येत नाहीत, असे न्यायालयाने म्हटले आहे; तसेच या शिक्षकांच्या वेतनासाठी सरकार पैसे देत नाही. त्यामुळे अशी सक्ती म्हणजे स्वायत्तता आणि शिक्षण देण्याच्या कामाच्या हक्कांतील हस्तक्षेप आहे, हा शिक्षक संघटना आणि शाळांचा युक्तिवाद न्यायालयाने मान्य केला आहे. त्यामुळे 'हे काम नाकारताच येणार नाही,' या सरकारी समजुतीला सध्या तरी धक्का बसल्याचे दिसते. पुढील सुनावणी ३१ जुलै रोजी होईल. तोवर सर्वोच्च न्यायालयाने या स्थगिती आदेशात बदल न केल्यास सध्याच्या टप्प्यावरील जनगणनेच्या कामासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती कोठून करणार, हा प्रश्न सोडवावा लागेल.

गेल्या काही दिवसांत सरकारी पातळीवरून याबाबत दडपशाहीसारखे वातावरण होते. 'हे काम केले नाही, तर फौजदारीला सामोरे जावे लागेल,' अशा बजावणीमुळे शिक्षकांमध्ये धास्ती होती. काही शहरांत तर सर्वच शिक्षक या कामावर गेल्याने वर्ग ओस पडण्याची वेळ आली होती. मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीचे (एसआयआर) कामही नेमके याच काळात आल्याने सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांनाच त्यासाठीही जुंपण्यात आले आहे. जनगणनेसारख्या राष्ट्रीय कर्तव्याला नकार देणे नैतिकदृष्ट्या योग्य नाही; पण कायद्यात तशी सुस्पष्ट तरतूद हवी. सोबतच अन्य वर्षभरात शिक्षकांना वेगवेगळ्या तथाकथित अशैक्षणिक कामांच्या 'कर्तव्यां'साठी वेठीस धरले जाते. या निमित्ताने अनुदानित शाळांमधील शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांच्या बोजाचीही दखल घेतली पाहिजे. न्यायालयाच्या आदेशांकडे पाठ फिरवून ग्रामस्वच्छता अभियान, 'पाणी अडवा-पाणी जिरवा' किंवा 'मुख्यमंत्री सुंदर शाळा योजना' मतदार जनजागृती येथपासून पशुगणनेसारख्या विविध कामांसाठी शिक्षकांना राबवून घेतले जाते. खासगी शाळांमधील शिक्षकांना ही सक्ती नसली, तरी तेथील व्यवस्थापन त्यांना अपुऱ्या वेतनात खासगी नोकरासारखे राबवून घेते. गेल्या काही काळात राज्यात शिक्षकांची भरती न झाल्याने हजारो जागा रिक्त आहेत; परिणामी अतिरिक्त कामाचा बोजा उर्वरित शिक्षकांवर आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना किमान कौशल्येही आत्मसात नसल्याचे विविध अहवालांतून समोर आले आहे. अशा वेळी शिक्षकांना अधिक वेळ देऊन वर्गांत शिकवू द्या, ही मागणी गैर नाही. आता जनगणनेच्या कामासाठी शिक्षक उपलब्ध न झाल्यास काय करावे, हा प्रश्न खराच; त्यासाठी सुशिक्षित बेरोजगारांना हे काम सोपवणे, स्वनोंदणीला प्रोत्साहन किंवा शिक्षक संघटनांना विश्वासात घेऊन हे काम करून घेणे आदी पर्यायांचा विचार व्हावा.

# राष्ट्रभक्ती, क्रांती आणि सामाजिक परिवर्तनाचा धगधगता इतिहास

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील तेजस्वी क्रांतिकारक, विचारवंत, साहित्यिक आणि समाजसुधारक विनायक दामोदर सावरकर यांची जयंती दिन म्हणून २८ मे हा दिवस संपूर्ण देशभर स्मरणात ठेवला जातो. 'स्वातंत्र्यवीर' म्हणून ओळखले जाणारे सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते एक दूरदर्शी व द्रष्टे राष्ट्रनायक होते. त्यांच्या विचारांनी, लेखनाने आणि त्यागाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवे बळ दिले.

**बालपण आणि शिक्षण**

विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात देशभक्तीची भावना प्रखर होती. शालेय जीवनात त्यांनी मित्रांच्या सहाय्याने 'मित्रमेळा' ही संघटना स्थापन केली. पुढे या संघटनेचे 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संघटनेत रूपांतर झाले. उच्च शिक्षणासाठी ते फर्ग्युसन महाविद्यालयात आले. शिक्षणासोबतच त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचे कार्य अधिक व्यापक केले. त्यांची भाषणे आणि लेखन युवकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करणारे होते.

**लंडनमधील क्रांतिकारक कार्य**

उच्च शिक्षणासाठी सावरकर इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी इंडिया हाऊसमध्ये राहून भारतीय विद्यार्थ्यांना संघटित केले. त्यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमराला 'भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध' असे संबोधले आणि त्यावर त्यांनी लिहिलेला ग्रंथ ब्रिटिश सत्तेला हादरा देणारा ठरला. त्यांच्या क्रांतिकारक कार्यामुळे ब्रिटिश सरकार सतर्क झाले. १९१० मध्ये त्यांना अटक करण्यात आली. भारतात आणताना त्यांनी फ्रान्समधील मार्सेलिस बंदरात जहाजातून उडी मारून पळून जाण्याचा धाडसी प्रयत्न केला; मात्र त्यांना पुन्हा पकडण्यात आले.

**काळ्या पाण्याची शिक्षा**

सावरकरांना दोन जन्मठेपांची शिक्षा सुनावण्यात आली आणि त्यांना सेल्यूलर जेलमध्ये पाठविण्यात आले. 'काळ्या पाण्याची शिक्षा' म्हणून ओळखली जाणारी ही शिक्षा अत्यंत कठोर होती. अमानुष छळ, सक्तमजुरी आणि एकाकी जीवन यांचा सामना करतानाही त्यांची जिद्द ढळली नाही. कारागृहात असतानाच त्यांनी अनेक कविता आणि लेख लिहिले. कागद-पेन नसताना भिंतींवर कविता कोरणारे आणि त्या पाठ करून ठेवणारे सावरकर यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण



कूशाग्र होते.

**साहित्यिक आणि विचारवंत सावरकर**

सावरकर हे प्रभावी साहित्यिक होते. कविता, नाटके, इतिहास, आत्मचरित्र आणि सामाजिक विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले. 'जयस्तुते', 'ने मजसी ने परत मातृभूमीला' यांसारख्या त्यांच्या कविता आजही देशभक्तीची प्रेरणा देतात. त्यांनी हिंदुत्व, राष्ट्रवाद, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक सुधारणांविषयी स्पष्ट विचार मांडले. जातिभेद, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धांविरोधात त्यांनी आवाज उठविला. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असा त्यांचा आग्रह होता.

**सामाजिक सुधारक म्हणून योगदान**

रत्नागिरीत नजरकैदेत असताना सावरकरांनी सामाजिक एकात्मतेसाठी मोठे कार्य केले. मंदिरप्रवेश, सहभोजन आणि अस्पृश्यता निर्मूलन यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या. समाजातील भेद मिटवून राष्ट्रीय ऐक्य मजबूत करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

**सावरकरांचे राष्ट्रदर्शन**

सावरकरांचे राष्ट्रप्रेम अत्यंत प्रखर होते. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नसून राष्ट्राची सांस्कृतिक, सामाजिक आणि मानसिक उन्नती होय, असे त्यांचे मत होते. शौर्य, संघटन आणि स्वाभिमान हे राष्ट्रबांधणीचे मुख्य आधार असल्याचा त्यांनी प्रचार केला.

**आजच्या काळातील सावरकरांचे महत्त्व**

आजच्या काळातही सावरकरांचे विचार नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतात. देशभक्ती, आत्मविश्वास, विज्ञाननिष्ठ दृष्टी आणि सामाजिक एकात्मता यांचा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो. राष्ट्रहित सर्वोच्च मानून कार्य करण्याची प्रेरणा त्यांच्याकडून मिळते. सावरकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणादायी गाथा आहे. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान भारतीय इतिहासात अजरामर आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करून राष्ट्रसेवेची प्रेरणा घेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. **दै. 'ग्लोबल महातेज' परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन!**

# बोगस शालार्थ आयडी घोटाळा निर्णायक वळणावर

## नाशिकमधील शुक्रवारच्या अंतिम सुनावणीत ठरविली जाणार भूमिका?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नाशिक विभागातील बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणाने आता निर्णायक टप्पा गाठला आहे. त्यासंदर्भात अंतिम सुनावणी शुक्रवार, दि. २९ मे रोजी नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या कार्यालयात होणार असल्याचे सांगितले जात आहे. या सुनावणीकडे जळगाव जिल्ह्यातीलही शेकडो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि संस्थाचालकांचे लक्ष लागले आहे. अनेकांच्या नोकऱ्या आणि भवितव्यावर या निर्णयाचा थेट परिणाम होणार असल्याने शिक्षण क्षेत्रात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे.

नाशिक विभागातील खासगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील तब्बल ८९२ कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी शासकीय नोंदीतील जावक क्रमांकांशी जुळत नसल्याचे चौकशीत उघड झाले होते. या प्रकारामुळे शालार्थ प्रणालीतील पारदर्शकता, मान्यता प्रक्रिया आणि शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. संबंधित कर्मचाऱ्यांना मिळालेल्या वैयक्तिक मान्यता आणि शालार्थ आयडी प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्या अनुषंगाने या संपूर्ण प्रकरणाची विभागीय स्तरावर चौकशी गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. जळगाव जिल्ह्यातीलही काही शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यापूर्वी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणताही अंतिम निष्कर्ष किंवा ठोस कारवाईचे पाऊल उचलण्यात आलेले नाही. त्यामुळे संबंधित कर्मचारी आणि संस्था चालकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तशात आता तिसऱ्यांदा होणारी ही अंतिम सुनावणी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यानंतर प्रशासनाकडून कठोर निर्णय घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजेपासून नाशिक येथील विभागीय शिक्षण मंडळ कार्यालयात सुनावणीची प्रक्रिया सुरू होणार आहे. या सुनावणीसाठी जळगावसह नाशिक विभागातील विविध जिल्ह्यांमधून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आजी-माजी मुख्याध्यापक, संस्थाचालक तसेच शिक्षण विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, एका कर्मचाऱ्याच्या प्रकरणात अनेक संबंधितांना उपस्थित राहावे लागत असल्याने सुनावणी प्रक्रिया अधिक वेळखाऊ ठरत असल्याची तक्रार आहे. कारण, प्रत्येक सुनावणीवेळी संबंधितांना तीन ते चार दिवस नाशिकमध्ये मुक्काम करावा लागत असल्याने आर्थिक भार वाढतो.

प्रवास, निवास आणि इतर खर्चामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत असल्याचे समोर आले आहे. यासोबतच शाळांचे दैनंदिन कामकाजही विस्कळीत होत असल्याने शिक्षण क्षेत्रातून नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटना समन्वय समितीचे समन्वयक तुळशीराम सोनवणे यांनी सर्व सुनावण्या जिल्हास्तरावरच घेण्याची मागणी केली आहे. संबंधितांना वारंवार नाशिकला जावे लागत असल्याने वेळ आणि पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आतापर्यंत अनेक सुनावण्या होऊनही अंतिम निर्णय होत नसल्यामुळे संबंधित कर्मचारी मानसिक तणावाखाली असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. अंतिम सुनावणीनंतर दोषींवर कारवाई होणार का, संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा अबाधित राहणार का आणि प्रशासन या संपूर्ण प्रकरणात कोणती भूमिका घेणार, याकडे आता संपूर्ण शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# त्याग, संघर्ष आणि प्रेरणेची मूर्ती

**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या यशामागे ज्यांनी निःशब्दपणे आयुष्य वेचले, त्या म्हणजे मातोश्री रमाबाई आंबेडकर. दि. २६ मे रोजी त्यांचा स्मृतिदिन देशभरात आदराने साजरा झाला. यात विविध सामाजिक संस्था, आंबेडकरी संघटना आणि नागरिकांनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. हा केवळ रमाबाईंचा त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी होत्या म्हणून स्मरणदिन साजरा केला जात नाही तर रमाबाईंच्या रुपाने त्याग, सहनशीलता आणि संघर्ष यांचे प्रतीक असलेल्या एका आदर्श स्त्रीच्या जीवनकार्याला अभिवादन करण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो.

**बालपण आणि प्रारंभिक जीवन**

रमाबाई यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. लहान वयातच आई-वडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्यांना बालपणापासूनच कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. शिक्षणाची संधी न मिळाल्याने त्या निरक्षर राहिल्या, मात्र जीवनज्ञान आणि संवेदनशीलता यांमध्ये त्या अत्यंत समृद्ध होत्या. १९०६ मध्ये त्यांचा विवाह तरुण भीमराव आंबेडकर यांच्याशी झाला. त्या काळात बाबासाहेब शिक्षणासाठी संघर्ष करत होते. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. अशा वेळी रमाबाईंनी संसाराची सर्व जबाबदारी खंबीरपणे सांभाळली.

**बाबासाहेबांच्या संघर्षातील खंबीर साथीदार**

डॉ. आंबेडकर उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले असताना रमाबाईंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत घर सांभाळले. अनेक वेळा उपासमार, आर्थिक चणचण आणि मुलांच्या आजारपणाला सामोरे जावे लागले. त्यांच्या अनेक मुलांचा अल्पवयात मृत्यू झाला, ही वेदना त्यांनी शांतपणे सहन केली. रमाबाईंनी कधीही बाबासाहेबांच्या शिक्षणात किंवा समाजकार्यात अडथळा आणला नाही. उलट 'तुम्ही शिका आणि समाजासाठी काम करा,' अशी प्रेरणा त्यांनी दिली. बाबासाहेबांनीही आपल्या लेखनातून आणि भाषणांत रमाबाईंच्या त्यागाचा उल्लेख अनेकदा कृतज्ञतेने केला आहे.



**साधेपणा आणि अध्यात्म**

रमाबाई अत्यंत साध्या, संयमी आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांना पंढरीच्या विठ्ठलाविषयी अपार श्रद्धा होती. घरातील कठीण प्रसंगातही त्यांनी धैर्य आणि श्रद्धा सोडली नाही. त्यांच्या जीवनात त्यांनी प्रसिद्धीपेक्षा कर्तव्याला अधिक महत्त्व दिले.

**निधन** : २७ मे १९३५ रोजी रमाबाई आंबेडकर यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बाबासाहेब अत्यंत व्यथित झाले होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील हा मोठा आधार गमावला होता. बाबासाहेबांनी 'रमा' या नावाने त्यांचा उल्लेख केवळ अत्यंत प्रेमानेच नव्हे तर आदरानेही सतत केला आहे.

### समाजासाठी प्रेरणास्थान

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे संघर्षातही धैर्याने उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी स्वतःच्या इच्छा-आकांक्षा बाजूला ठेवून एका महान ध्येयासाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या त्यागामुळेच बाबासाहेबांना शिक्षण पूर्ण करून समाजपरिवर्तनाचे महान कार्य करता आले. आजच्या पिढीने रमाबाईंच्या जीवनातून संयम, कष्ट, कुटुंबनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांचे मूल्य शिकण्याची गरज आहे. त्यांचे कार्य आणि त्याग भारतीय समाजाच्या इतिहासात सदैव प्रेरणादायी राहतील. मातोश्री रमाबाई आंबेडकर या केवळ बाबासाहेबांच्या पत्नी नव्हत्या, तर त्यांच्या संघर्षयात्रेतील शक्तीस्तंभ होत्या. त्यांचे जीवन हे निःस्वार्थ प्रेम, त्याग आणि कर्तव्यपरायणतेचे तेजस्वी उदाहरण आहे. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त **दै. 'ग्लोबल महातेज' परिवारातर्फे विनम्र अभिवादन!**







हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ‘तुला काहीच येत नाही’ म्हणणाऱ्यांना कसे दिले उत्तर?

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वप्न तेच पूर्ण करतात जे लोकांना शब्दांनी नाही तर कष्टाने उत्तर देतात. आपल्या आयुष्यात असे अनेकदा प्रसंग येतात. जेव्हा लोक आपल्या इच्छाशक्तीवर वार करण्याचा प्रयत्न करतात. असाच अनुभव अनु कुमारीला आला. जेव्हा त्या एका ठिकाणी शंकांचे निरसन करण्यासाठी गेल्या. तेव्हा त्यांना एका कोचिंग क्लासच्या संचालकाने सुनावले की, तुला एवढेही माहिती नसेल तर तुझे सिलेक्शन होईल हे विसरून जा. मात्र या टिकेने त्या खचून न जाता त्यांनी यूपीएससीची तयारी सुरू ठेवली आणि आयएएस बनून त्यांनी टीकाकारांना उत्तर दिले.

### शैक्षणिक पार्श्वभूमी आणि कुटुंब

अनु कुमारी या हरीयाणातील सोनीपतच्या रहिवासी आहेत. त्यांनी एका मुलाखतीत सांगितले की, दिल्ली विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात पदवी प्राप्त केली. आयएमटी नागपूर येथून ‘फायनान्स आणि मार्केटिंग’मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर २०१५ मध्ये त्यांचा विवाह झाला. पण कुटुंबाच्या जबाबदाऱ्या संभाळत त्यांनी युपीएससीच्या तयारीस सुरुवात केली. अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रीत करता यावे, याकरिता त्यांनी २ वर्ष आपल्या मुलापासून दूर राहिल्या. पहिल्या प्रयत्नात एका गुणाने अपयशी झालेल्या अनु कुमारी यांनी हार न मानता पुन्हा अभ्यास सुरु केला.

### २०१७ मध्ये मिळविला भारतातून दुसरा क्रमांक

एका व्हिडिओमध्ये त्यांनी सांगितले की, मुख्य परीक्षेच्या १०-१५ दिवस पूर्वी त्या काही शंकांचे निरसन करण्यासाठी एका कोचिंग क्लासकडे गेल्या, तेव्हा कोचिंग क्लास (एआयआर २) मालकाने त्यांना ऐकवले की ‘तुला एवढेही येत नसेल तर तुझे सिलेक्शन होईल हे विसरून जा’. मात्र त्यांनी धैर्याने अभ्यासात सातत्य ठेवले. २०१७ मध्ये त्यांनी संपूर्ण भारतातून दुसरा क्रमांक मिळवून लोकांच्या टिकेला उत्तर दिले. ताज्या माहितीनुसार, त्या केरळमधील तिरूवनंतपुरम येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

### योग्य रणनीती मिळवून देते यश

अनु कुमारी त्यांच्या अभ्यासात अत्यंत शिस्तप्रिय होत्या. तयारीच्या काळात त्या दररोज सुमारे १० ते १२ तास अभ्यास करायच्या. सकाळी लवकर उठून त्या मॉर्निंग वॉकच्या वेळी ‘ऑल इंडिया रेडिओ’ ऐकायच्या आणि जेवताना राज्यसभा टीव्ही पाहायच्या. त्या म्हणतात की, यूपीएससीच्या परीक्षेत प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. त्यामुळे योग्य रणनीतीच यश मिळवून देते.






**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मिठाच्या पाकिटावर ‘बेस्ट बिफोर’ किंवा एक्सपायरी डेट लिहिलेली दिसते. मात्र सामान्यतः शुद्ध मीठ कधी खराब होत नाही.
मिठामध्ये नैसर्गिकरित्या जंतूंची वाढू होऊ शकत नाही. त्यामुळे मीठ हे दीर्घकाळ टिकणाऱ्या पदार्थांपैकी एक आहे.

काही प्रकारच्या मिठामध्ये अतिरिक्त आयोडीनयुक्त, अँटी-कैकिंग एजंट, फ्लेवर्ड किंवा हर्बल मीठ असे घटक मिसळलेले असतात. मीठातील आयोडीन कमी होऊ शकते. त्यामुळे अशा मिठाची गुणवत्ता काही प्रमाणात कमी होते. म्हणून उत्पादक कंपनीकडून “Best Before” कालावधी दिला जातो
साधे शुद्ध मीठ, समुद्री मीठ किंवा खडेमीठाची योग्य प्रकारे साठवणूक केल्यास अनेक वर्षे टिकू शकते.

आयोडीनयुक्त मीठ हे साधारणतः १ ते २ वर्षे उत्तम गुणवत्तेसह टिकून राहू राहते, त्यानंतर त्यातील आयोडीनचे प्रमाण कमी होण्यास सुरूवात होते
फ्लेवर्ड मीठ, लसूण, हर्ब्स किंवा मसाले मिसळलेले मीठ लवकर खराब होण्याची शक्यता असते.

मिठात गुठळ्या होणे, रंग बदलणे, ओलसर होणे, विचित्र वास येणे, हे बदल ओलावा किंवा चुकीच्या पद्धतीने साठवणूक केल्यामुळे होतात. हवाबंद डब्यात, ओलसर जागेपासून दूर, थेट सूर्यप्रकाशापासून लांब आणि कोरड्या ठिकाणी मीठ ठेवल्यास जास्त दिवस टिकते.

# महिलांनो, उन्हाळ्यात या ५ चुका नक्की टाळा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**१) पाणी कमी पिणे**

शरीरात पाण्याची कमतरता झाली की थकवा, डोकेदुखी, त्वचा निस्तेज होणे आणि कमजोरी जाणवू शकते. म्हणून दिवसभर योग्य प्रमाणात पाणी पिणे खूप गरजेचे आहे.

**२) जेवण स्किप करणे**

‘वजन कमी होईल’ म्हणून जेवण टाळणे शरीराला कमजोर बनवू शकते. उन्हाळ्यात हलके पण पौष्टिक अन्न खाणे महत्त्वाचे आहे.

**३) सतत ‘एसी’मध्ये राहणे**

जास्त वेळ ‘एसी’मध्ये राहिल्याने शरीरात स्टिफनेस, त्वचा कोरडी पडणे आणि लो एनर्जी जाणवू शकते.

**४) झोपेकडे दुर्लक्ष करणे**

उन्हामुळे झोप डिस्टर्ब होऊ शकते. पण पुरेशी झोप न घेतल्यास हार्मोन्स आणि मूडवर परिणाम होऊ शकतो.

**५) स्वतःच्या हेल्थकडे दुर्लक्ष करणे**

घर, काम आणि फॅमिली सांभाळताना अनेक महिला स्वतःची काळजी घ्यायला विसरतात. पण तुम्ही हेल्दी राहिलात तरच सगळ्यांची काळजी चांगली घेऊ शकाल.

# ताक पिण्याचे काय आहेत फायदे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शास्त्रात ताज्या ताकाची तुलना अमृताशी केलेली आहे. ताक हे शरीरातील घातक पदार्थ मूत्रावाटे बाहेर काढून शरीरात रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास मदत करते.

ताकात विटामिन ‘बी १२’ कॅल्शियम, पोटेशियम आणि फास्फरससारखे तत्त्व असतात, जे शरीरासाठी फारच फायद्याचे असतात. ज्याचे पोट साफ होत नाही आणि पोटातून आवाज येतात त्यांनी ताक पिल्याने असे आजार नाहीसे होतात. ताक प्यायल्यानंतर शरीराची झीज ९० टक्के भरून निघून शरीरातील उष्णता त्वरित कमी होऊन अतिशय शांत झोप लागते. साधारण माणसाने सुद्धा दररोज ताक पायल्याने शरीरातील उष्णता लगेच कमी होते आणि ताकद प्रचंड प्रमाणात वाढते.

**ताक पिण्याचे १० फायदे जाणून घेऊ आणि कोल्ड्रिंक पिणे थांबवा...**



१) ताक प्यायल्याने लठ्ठपणा कमी होतो.
२) वारंवार लघवीचा त्रास होत असेल तर ताकात मीठ टाकून प्यावे. त्रास कमी होतो.
३) दह्याचे पाणी अथवा ताकाने गुळण्या केल्यास तोंड येणे बरे होते.
४) ताकात ओवा टाकून प्यायल्यास पोटातील जंतू मरुन जातात.
५) ताकात गुळ टाकून प्यायल्यास लघवी करताना होणारी जळजळ बंद होते.
६) थोडी जायफळ पूड ताकात टाकून प्यायल्यास डोकेदुखी कमी होते.
७) रिकाम्या पोटी ताक प्यायल्याने पोटदुखी बरी होते.
८) ताकात साखर आणि काळी मिरी टाकून प्यायल्यास पित्ताचा त्रास कमी होतो.
९) लहान मुलांना दात येतेवेळी त्यांना दररोज ४ चमचे असे दिवसभरातून २-३ वेळा दिल्यास दात येताना मुलांना होणारा त्रास कमी होतो.
१०) महत्वाचे म्हणजे तीन दिवस इतर काहीही न खाता ताक पीत राहल्यास आपल्या शरीराचे पंचकर्म आपोआप होते.

प्रकृती ठीक तर होईलच; पण पैसाही वाचेल. असे सहा महिन्यांत एक वेळ करा. आपणास होणारे भावी मोठे आजार पण टळतील. त्यामुळे होणारा त्रास व औषधी खर्चही वाचेल.

चला तर मग आजपासून ताक पिण्यास सुरूवात करूया आणि कोल्ड्रिंक्स बंद करूया...









# श्रीक्षेत्र गाणगापूर आणि निर्गुण पादुका यांचे महात्म्य!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

औदुंबर, नरसोबाची वाडी, पिठापूर, गाणगापूर, माहूर, गिरणार पर्वत ही श्री दत्तगरूंची प्रसिद्ध ठिकाणे म्हणून ओळखली जातात. पण सर्वांत जास्त गर्दी असते ती श्रीक्षेत्र गाणगापूरला. कारण तेथे असणाऱ्या निर्गुण पादुका. काय आहे निर्गुण पादुकांचे महात्म्य जाणून घेऊया.

दत्तगुरूंना भेटण्यासाठी लाखो लोक श्रीक्षेत्र गाणगापूरला येतात. कर्नाटकमधील गुलबर्गा जिल्ह्यामधील गाव असून दत्तगुरूंचे एक प्रसिद्ध देवस्थान आहे. भीमा आणि अमरजा या नद्यांचा संगम ज्या ठिकाणी होतो तेथे वसलेले आहे. दत्त महाराजांचा दिव्य अवतार श्रीनृसिंह सरस्वती महाराज यांनी २२ ते २३ वर्षे येथे वास्तव्य केले. निर्गुण पादुका मठ, भस्म महिमा, अष्टतीर्थ महिमा, माधुकरी, संगमेश्वर मंदिर, औदुंबर वृक्ष, विश्रांती कट्टा, निर्गुण पादुका यांचे महात्म्य येथे आहे.

**'प्रसिद्ध आमुचा गुरू जगी ।**
**नृसिंह सरस्वती विख्यात ॥**
**ज्याचे स्थान गाणगापूर ।**
**अमरजा संगम भीमातीर ॥'**

दत्त भक्तांची पंढरी अर्थात श्रीक्षेत्र गाणगापूर, दरवर्षी भक्तगण आपल्या दत्तगुरूंना भेटण्यासाठी येथे येतात. जेव्हा गाणगापूर असे म्हटले जाते त्यावेळी डोळ्यासमोर उभ्या राहतात 'निर्गुण पादुका'! या दिव्य निर्गुण पादुका म्हणजे साक्षात दत्त महाराजांचा अधिवास आहे. गाणगापूर तेथील पादुकांना 'निर्गुण पादुका' असे म्हणतात. गाणगापूरचे मुख्य पुजारी निगुर्ण पादुकांची महती सांगताना म्हणाले, की गाणगापूरमधील निगुर्ण पादुकांना खूप महत्त्व आहे. निर्गुण म्हणजे आकार नसलेल्या तर सगुण म्हणजे बोटे, नख वगैरे आहेत. निर्गुण म्हणजे निर्गुण निराकार. श्रीनृसिंह सरस्वती महाराज भीमा नदीमधून अवतार समाप्तीचा प्रवास करताना अचानक गुप्त जाहले. त्यानंतर सर्व भक्तांना या पादुका स्थळी 'श्रीनृसिंह सरस्वती' महाराजांनी दर्शन दिले आणि सांगितले, की मी निर्गुण पादूका सोडून कुठे जात नाही आणि गाणगापूर सोडून कुठे जात नाही, तुम्ही या निर्गुण पादुकांची पुजा करत राहा. त्याला पाणी, दही, दूध कशाचाही स्पर्श करायचा नाही. अत्तर आणि केशरचा वापर करायचा. तेव्हापासून आतापर्यंत पद्धतीने निर्गुण पादुकांची पूजा केली जाते आहे. या पादुका चल असून त्या त्यांच्या आकाराच्या संपुटांत ठेवलेल्या असतात. संपुटांतून मात्र त्या बाहेर काढल्या जात नाहीत. संपुटांना झाकणे आहेत.औदुंबर, नरसोबाची वाडी, पिठापूर, गाणगापूर, माहूर, गिरणार पर्वत ही श्री दत्तगुरूंची प्रसिद्ध ठिकाणे म्हणून ओळखली जातात. पण सर्वांत जास्त गर्दी असते ती श्रीक्षेत्र गाणगापूर येथे. याबद्दल माहिती देताना मुख्य



पुजारी म्हणाले, की गाणगापूरला लोक जास्त येण्याचे कारण म्हणजे मध्यमवर्ग दत्त महाराजांना खूप मानतो. आज भक्तांची अपार श्रद्धा दत्तगुरूंवर आहे. श्रीनृसिंह सरस्वती गुप्त झाल्यानंतर अनेक महान दत्तभक्तांच्या वास्तव्याने ही पवित्र भूमी अधिकच पवित्र बनलेली आहे. येथे सेवा केल्याने लाखो भक्तांच्या मनोकामना पूर्ण झालेल्या आहेत तसेच भाविकांना आजही येथे साक्षात दत्तदर्शन घडते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. तुम्ही मंदिरात येऊन दर्शन घेऊ शकता. गाणगापूरमध्ये पौर्णिमेचे खूप महत्त्व आहे. पहाटे होणाऱ्या काकड आरतीला भाविकांची अलोट गर्दी असते. आधी या स्थानाची महती लोकांना माहिती नव्हती. पण नंतर लोकांना ते समजले, एकमेकांकडून याचा प्रसार झाला. गाणगापूरला अष्टतीर्थांचा नित्य वास असल्यामुळे भाविकांची मोठी गर्दी पाहावयास मिळते. श्रीक्षेत्र गाणगापूर येथील अष्टतीर्थे नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी भक्तजनांसाठी दिवाळीचे प्रथम दिनी प्रकट केली. तो पुण्य पावन दिवस होता नरक चातुर्दशीचा. त्यामुळे दिवाळीत लाखो भक्तांची गर्दी गाणगापुरात पाहावयास मिळते.

**'वसती रानी संगमासी ।**
**जाती नित्य भिक्षेसी ॥**
**तया गाणगापुरासी ।**
**माध्यान्हकाळी परियेसा ॥'**

असा श्रीगुरुचरित्रात उल्लेख आहे. भक्तगण येथे यथाशक्ती अन्नदानाचा कार्यक्रम करतात. नेहमी येथे गुरुचरित्राचे पठण केले जाते. ते शांत चित्ताने ऐकणे हा देखील सेवेचा एक भाग असतो. श्रीक्षेत्र गाणगापूर म्हणजे श्रीनृसिंह सरस्वतींची पावनभूमी येथे त्यांनी अनेक भक्तांची दुःखे, संकटे कमी केली. निर्गुण पादुकांच्या रूपात साक्षात त्यांचे सगुण रूप पाहता येते. त्यामुळे श्रीक्षेत्र गाणागापूरला एकदा तरी जायला हवे.

**मठी ठेवीतो निर्गुण पादुका ।**
**पुरवीतील कामना ऐका**
**संदेह न धरावा मनात ।**
**ही मात आमची सत्य जाणा ॥**

अनिता किंदळेकर

जवळपास १५ वर्षांपासून प्रिंट, टेलिव्हिजन आणि डिजिटल माध्यमात पत्रकार, कंटेट रायटर, एआय लँग्वेज टुटर, भाषांतरकार, ब्लॉगर, म्हणून कार्यरत आहे. बातम्यांसह विविध विषयांवर लेख लिहिणे आणि भाषांतराचा उत्तम अनुभव आहे. विशेष करून आध्यात्मिक, धार्मिक आणि सण-वार-उत्सव यासंबंधी अचूक माहिती घेऊन सोप्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचविण्यात पारंगत आहे. एआयसाठी विविध विषयांवर आधारित कन्टेन्ट तयार करणे आणि रेकॉर्डिंग केले आहे. वाचन, मेडिटेशन, योगामध्ये रुची असून कथालेखन करायला आवडते. अनेकदा ब्लॉगच्या माध्यमातून ती आपल्या भावना व्यक्त करते.

# भक्तीसमोर दैवही बदलले!

## सुदेव ब्राह्मणाची भक्ती, श्रीहरीच्या कृपेचा चमत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान विष्णू सुदेव ब्राह्मणासमोर प्रकट झाले. साक्षात भगवंताला समोर पाहून सुदेवाला अपार आनंद झाला. त्याने मुक्तकंठाने श्रीहरींची स्तुती केली. त्यानंतर श्रीहरी सुदेवाला काय म्हणाले? जाणून घेऊया.

श्रीनारायण म्हणाले, की हे देवर्षी नारद! आता पुढील कथा ऐक. जेव्हा भगवान विष्णू सुदेव ब्राह्मणासमोर प्रकट झाले, तेव्हा त्याला अपार आनंद झाला. साक्षात भगवंत त्याच्यासमोर उभे होते. सुदेव हात जोडून नम्रपणे श्रीहरीची स्तुती करू लागला.

तो म्हणाला, की हे देवाधिदेव! त्रैलोक्याचे रक्षणकर्ते! मी तुम्हाला शरण आलो आहे. तुम्हीच सर्वांचे आधार, पालनकर्ता आणि दुःखांचा नाश करणारे आहात. मी दीन, दुःखी आणि अल्पबुद्धी आहे. तुमच्या महिमेचे वर्णन करण्यास मी असमर्थ आहे, तरीही मी तुम्हाला शरण आलो आहे. कृपा करून माझे रक्षण करा. त्याची करुण हाक आणि भक्तीने ओतप्रोत भरलेले शब्द ऐकून भगवान विष्णू प्रसन्न झाले आणि गंभीर स्वरात म्हणाले, की हे वत्सा! तुझी तपश्चर्या अत्यंत श्रेष्ठ आहे. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला जो वर हवा असेल तो माग.

तेव्हा सुदेव नम्रतेने म्हणाला, की हे प्रभो! जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल, तर मला एक सद्गुणी पुत्र द्या. पुत्राशिवाय माझे गृहस्थ जीवन ओसाड आहे असे मला वाटते.

हे ऐकून भगवान हरि काही क्षण शांत राहिले, नंतर म्हणाले, की हे ब्राह्मणा! तुझ्या नशिबात पुत्रसुख नाही. मी तुझे भविष्य पाहिले आहे. सात जन्मांपर्यंत तुला पुत्रप्राप्ती होणार नाही. त्यामुळे तू दुसरा काही वर माग. भगवंताचे हे कठोर शब्द ऐकून सुदेवाचे हृदय पिळवटून निघाले. मुळापासून तोडलेले झाड जमिनीवर कोसळते, त्याप्रमाणे तो जमिनीवर पडला. त्याची ही अवस्था पाहून त्याची पत्नी गौतमी अत्यंत व्याकुळ झाली आणि विलाप करू लागली. काही वेळाने धीर धरत गौतमी म्हणाली, की स्वामी! उठा. जे नशिबात लिहिलेले असते तेच मिळते. मनुष्य आपल्या कर्मांचे फळ भोगत असतो. जर भाग्य प्रतिकूल असेल, तर सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतात. त्यामुळे आता दैवाचा स्वीकार करा.

पत्नीचे हे शब्द ऐकूनही सुदेवाचे दुःख कमी झाले नाही. तेवढ्यात श्रीहरीचे वाहक गरुडजी हे दृश्य पाहून खूप दुःखी झाले. ते भगवान विष्णूंना म्हणाले, की हे प्रभो! हा ब्राह्मण आणि त्याची पत्नी तुमचे परमभक्त आहेत. यांचे दुःख पाहून तुम्हाला दया येत नाही का? तुम्ही नेहमीच भक्तांचे रक्षण केले आहे, मग आज यांना पुत्र देण्यास संकोच का करत आहात? हे नाथ! तुमच्यासाठी काहीही अशक्य नाही. तुम्ही जसे सुदाम्याला वैभव दिले आणि संदीपनी मुनींना त्यांचा मृत पुत्र परत मिळवून दिला, तसे या ब्राह्मणाला पुत्र देणे तुमच्यासाठी कठीण कसे असेल?

गरुडजींचे करुणेने भरलेले शब्द ऐकून भगवान विष्णू प्रसन्न झाले आणि म्हणाले, की हे वैनतेय! तू अगदी बरोबर बोलला, हा ब्राह्मण माझा भक्त आहे, त्यामुळे याला नक्कीच पुत्रप्राप्ती होईल. भगवंताची आज्ञा मिळताच गरुडजी अत्यंत आनंदित झाले आणि त्यांनी तात्काळ सुदेवाला एक सुंदर आणि योग्य पुत्र प्रदान केला.

श्रीनारायण म्हणाले, की हे नारद! अशा प्रकारे भगवंताच्या कृपेने आणि गरुडजींच्या विनंतीमुळे सुदेवाला पुत्रप्राप्ती झाली.

## अधिकमास विशेष कथासार

# पुण्यदायी मौनभोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऋषीवर्गाला सूत पुराणिकांकडून अधिकमास महात्म्य ऐकताना अपूर्व आनंद होत होता. एका ऋषीने प्रश्न केला, की महाराज, आजपर्यंत आम्ही स्नेहभोजन, प्रीतीभोजन, मिष्ठान्नभोजन, सहस्त्रभोजन वगैरे ऐकले होते. पण हे मौनभोजन म्हणजे नेमके काय? भगवान विष्णूंनी लक्ष्मीमातेला या मौनभोजनाची काय महती सांगितली?

उपवास केल्याने काय पुण्य मिळते, कोणते फळ पदरात पडते ते चंद्रिकेच्या कथेमधून आपण पाहिले आहेत. आता मौनभोजन केल्याचे फळ सांगतो. ज्या लोकांना शारीरिकदृष्ट्या उपवास करणे शक्य नाही, ज्यांना उपवास झेपत नाही, निभावत नाही त्यांनी अधिक महिन्यात भोजन घ्यावे. मात्र, ते फक्त एकदाच आणि ते कसे घ्यावे, तर मौन पाळून. मौन राखायचे, जेवताना बोलायचे नाही, याला मौनभोजन घेणे, असे म्हणतात. मौनव्रत धरून केवळ एकच वेळा भोजन करण्याचे व्रत या महिन्यात केले, तर खूप मोठे पुण्य पदरी पडते.

मौन राखायचे म्हणजे अवास्तव, अनावश्यक बडबड करू नये. स्नान करताना, होम-हवन करताना, भोजन करताना मौन पाळावे. मात्र, त्यावेळी भगवंताचे नाम मात्र घ्यायला आडकाठी नाही. स्नान करताना भगवंताचे नाम घेता येते. स्तोत्र पठण करता येते. होम-हवनावेळी मंत्र म्हणावेत. जेवताना देवाचे नाव घ्यावे. कारण भोजन करणे, उदरभरण करणे हाही एक प्रकारचा यज्ञच आहे. भोजनाच्या वेळीच नव्हे; तर अधिकाधिक वेळ मौन पाळावे. 'मौनम् सर्वार्थ साधनम्' हे शास्त्रवचन तर आपणा सर्वांना ज्ञात आहेच.

मौन पाळले की मौनधारकाच्या सर्व पापांचा नाश होतो. त्याला सुख सौभाग्य प्राप्त होते. त्याचे आयुष्यमान वाढते. त्याला आरोग्यप्राप्ती होते. मौन राखल्याने शक्तीचा अपव्यय होत नाही. वाद-विवाद अथवा भांडण-तंटा होत नाही. मनःशांती प्राप्त होते आणि वाणीला सिद्धता येते. याच कारणासाठी आपले ऋषी-मुनी, साधू- संत, सज्जन लोक हे मौन पाळत असत. त्यामुळेच अनेकांच्या वाणीला सिद्धता, सत्यता प्राप्त होत होती.

मौन याचा अर्थ निरर्थक बडबड करू नये. वितंडवाद वाढवू नये. विचारल्याशिवाय बोलू नये, सांगू नये आणि शक्ती वाया घालवू नये. अधिकमासातील मौनभोजन व्रताची सांगता ही देवाच्या मंदिरात घंटा बांधून केली जाते.

अवंतीनगरात एक सर्वसामान्य गृहस्थ राहत होता. त्याचे नाव वेदशर्मा. त्याने आपल्याला अन्य काही व्रत करता येत नाही तर आपण फक्त मौन पाळू, जेवणही एकदाच करू, जेवताना जे बोलायचे ते फक्त भगवान पुरुषोत्तमाचे नाम. त्याचेच नाव घ्यायचे, दर्शन घ्यायचे, ध्यान करायचे आणि पुरुषोत्तमालाच अनन्यभावे शरण जायचे, असा नियम केला. मोठ्या सश्रद्ध मनाने, निष्ठेने त्याने तो नेमही पूर्ण केला. परिणामी शेवटी त्या वेदशर्माला स्वर्गीय सुखाची प्राप्ती झाली.

ज्यांना हे असे मौनभोजन अखंड महिनाभर करता येणे शक्य नसेल त्यांनी निदान दशमी, द्वादशी, पौर्णिमा, अमावास्या, व्यतिपात, वैधृती या दिनी तरी निष्ठेने हे मौनव्रत पाळावे. अशा मौनव्रताने पुण्य वाढते आणि भगवंताची कृपा होते. मौनधारकाला आरोग्य, धनसंपदा याचा लाभ होतो. सुख-शांती मिळते. हा एक साधा, सोपा आणि सर्वांना सहज करता येण्यासारखा उपाय आहे. कंठी नाम धरा, जनी मौन राखा आणि खऱ्या अर्थाने सुखी व्हा.

# भगवान नारायण यांनी नारदमुनींना नेमके काय सांगितले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजा परीक्षित गंगेच्या काठावर पोहोचला, तेव्हा भगवान शुक्रदेवाने त्याला श्रीमद्भागवताची अमृततुल्य कथा सांगितली. ती कथा ऐकून राजा परीक्षिताला मोक्ष मिळाला. ते दिव्य दृश्य पाहून आणि तेथील पवित्र वातावरणाचा अनुभव घेऊन, मी तुमच्या यज्ञाचा साक्षीदार होण्यासाठी येथे आलो आहे. तुमच्यासारख्या ब्राह्मणांना पाहण्याचे भाग्य मला लाभले आहे. ऋषी म्हणाले, की हे सूतजी! तुम्ही भगवान व्यासांकडून जे ऐकले आहे ते खरोखरच अद्भुत आणि दुर्मिळ आहे. कृपया आम्हाला ती कथा सांगा जी जीवनाचा गाभा आहे, जी मनाला शांती देते आणि जी अमृतापेक्षाही अधिक लाभदायक आहे.

सूतजींनी विनम्रपणे उत्तर दिले, की मी एक सामान्य व्यक्ती आहे, पण हे माझे भाग्य आहे की तुम्ही महान ऋषीमुनी मला प्रश्न विचारत आहात. मी तुम्हाला तेच सांगेन जे मी माझे गुरू व्यास यांच्याकडून ऐकले आहे. त्यानंतर सूतने एक प्राचीन कथा सांगितली. तो म्हणाला, की एकदा देवर्षी नारद बद्रीनाथजवळील नर-नारायण आश्रमात आले. तो आश्रम अत्यंत पवित्र आणि दिव्य होता. तेथे असंख्य तपस्वी, सिद्ध आणि देवता राहत होते. सभोवतालची हिरवळ, फळे आणि फुलांनी लगडलेली झाडे, आणि गंगा व अलकनंदा या पवित्र नद्यांच्या प्रवाहांमुळे ते ठिकाण अधिकच सुंदर दिसत होते. तेथे पोहोचल्यावर नारद मुनींनी भगवान नारायणाला साष्टांग नमस्कार केला.

भगवान नारायण गहन ध्यानात मग्न होते आणि त्यांच्या तेजाने संपूर्ण वातावरण उजळून निघाले होते. त्यांना पाहून नारदांनी अत्यंत आदराने आणि प्रेमाने त्यांची स्तुती केली. नारद म्हणाले, की हे देवांच्या राजा! हे जगन्नाथ! तुम्ही दयेचा सागर आहात. तुमची तपश्चर्या सर्व जीवांच्या कल्याणासाठी आहे. कलियुगात जीव अज्ञान आणि सांसारिक इच्छांमध्ये अडकले आहेत. अशा वेळी, कृपया त्यांना वाचवण्यासाठी एखादा सोपा आणि प्रभावी मार्ग सुचवा, ज्यामुळे त्यांचे कल्याण आणि मुक्ती होईल. मलाही तुमच्याकडून तेच ज्ञान ऐकण्याची इच्छा आहे.

नारदाचे मधुर आणि दयाळू शब्द ऐकून भगवान नारायण प्रसन्न झाले आणि म्हणाले, की हे नारदा! तुला देवाचे मोठेपण माहीत आहे, तरीही तू लोकांच्या कल्याणाची मागणी करत आहेस. हे फार चांगले आहे. मी तुला एक अत्यंत पुण्यकारक रहस्य सांगतो - पुरुषोत्तम महिन्याचे महत्त्व. भगवान नारायण म्हणाले, की हा पुरुषोत्तम महिना अत्यंत पवित्र आहे. त्याचे अधिपती स्वतः भगवान पुरुषोत्तम आहेत. जो कोणी भक्त या महिन्यात उपवास करतो, नामजप करतो, दानधर्म करतो आणि भक्तीभावाने पूजा करतो, त्याच्यावर देव अत्यंत प्रसन्न होतो आणि त्याला सर्व दुःखांपासून मुक्त करतो.

नारदाने पुन्हा विचारले, की हे भगवान! मी इतर महिन्यांच्या देवतांविषयी ऐकले आहे, पण पुरुषोत्तम महिन्याचे रहस्य काय आहे? या काळात काय करावे, कोणते नियम पाळावेत आणि त्याचे काय फायदे आहेत? कृपया सविस्तर सांगा. नारदजी पुढे म्हणाले, की हे प्रभू! या जगात अनेक दुःखी लोक आहेत. काही गरीब आहेत, काही आजारी आहेत, काहींना मूलबाळ नाही, काही दुःख आणि शोकाने ग्रस्त आहेत. कृपया अशा सर्व लोकांचे दुःख कमी करण्यासाठी आम्हाला उपाय सांगा. सूतजी म्हणतात, की नारदजींचे हे करुणामय शब्द ऐकून, भगवान नारायणांनी संपूर्ण जगाला लाभ व्हावा म्हणून गंभीर आणि शांत आवाजात पुढील कथा सांगायला सुरूवात केली.

# उपवासाचे फळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लक्ष्मी माता भगवान विष्णू अर्थात नारायणांना विचारते, की हे प्रभू, नागराजाच्या आज्ञेप्रमाणे त्या सावित्रीच्या पतीने अन्नदान केले. सावित्रीप्रमाणे तोही भगवंताच्या नामस्मरणात रंगून गेला. नागराजाच्या आशीर्वादाने त्यांना खूप धन मिळत राहिले. इतकेच नव्हे, तर शेवटी प्रभूचरणांशी स्थान मिळाले, खरे ना? 'होय देवी, हे असेच झाले. कारण मी माझ्या भक्तांचे नेहमी कल्याणच करतो.' 'मग हे जगन्नाथा, आता मला अधिक मासातील उपोषण व्रताचे महत्त्व सांगणारी कथा सांगा.' लक्ष्मी माता यांनी प्रार्थना केली.

नर्मदा नदीकाठावरील माहिष्मती नावाच्या एका नगरीत एक स्त्री राहत होती. दुर्दैवाने ती विधवा होती. त्या अभागिनीचे नाव होते चंद्रिका. चंद्रिका आपल्या सत्कर्मांनी आपल्या दुर्दैवावर मात करत होती. ती नेहमी भगवतभक्ती करत होती. अधिक महिन्यातही तिने स्नान, दान, पूजन, स्मरण इत्यादी कर्मे, व्रते ही मोठ्या निष्ठेने केली होती. असाच एक अधिकमास आला आणि चंद्रिकेच्या मनाने घेतले, की आपण या महिन्यात कडक उपवासाचे व्रत करायचे. ती नुसते बोलून-ठरवून थांबली नाही, तर तिने खरोखरच ते व्रत निष्ठेने पूर्णत्वाकडे नेले.

या उपवासाचा तिच्या शरीरावर परिणाम झाला. ती अधिक थकली. तिला धड चालताही येईना. याचा परिणाम म्हणून की काय, व्रताच्या शेवटच्या दिवशी ती नर्मदेवरून स्नान करत येत असताना रस्त्यातच कोसळली. 'नारायणा.. प्रभूदेवा' तिने देवाला हाक मारली. तो आवाज ऐकून जवळच्या झोपडीमधून एक म्हातारी बाहेर आली. ती धावत पुढे आली. तिने चंद्रिकेला सावरले, आधार दिला, थोडे पाणी पाजले आणि तिला नीट उठून बसवले. तिच्या चेहऱ्याकडे पाहत ती म्हातारी म्हणाली, की 'चंद्राबाई, काय ही दशा झाली तुमची? मला ओळखले?' तेव्हा त्या म्हातारीच्या सुरकुतलेल्या चेहऱ्याकडे पाहत चंद्रिकेने कबुली दिली, 'नाही गं म्हातारे, कोण तू? मी तुला ओळखले नाही, आता तूच सांग कोण तू?'

तेव्हा ती म्हातारी म्हणाली, की 'चंद्राबाई, फार-फार वर्षांपूर्वी म्हणजे तुमचे मालक असताना, मी तुमच्या घरी धुणीभांडी करायला येत होते. आता पटली का ओळख? ते जाऊ द्या, पण बाई तुमची अशी अवस्था का झाली? तुमच्या पोटाला काही मिळत नाही का?' 'मिळत गं! पण मीच काही खात नाही.' चंद्रिका म्हणाली. 'तुमचे काही व्रत आहे का?' म्हातारीने विचारले. 'अग, सध्या अधिकमास आहे ना, म्हणून मी महिनाभर कडक उपवासाचे व्रत केले आहे. मी गेल्या महिनाभरात कणभरही अन्न ग्रहण केलेले नाही. त्यामुळे मला हा असा थकवा आणि चक्कर आली.' चंद्रिकेने असे स्पष्टीकरण दिले.

'अग बाई, तू वेडी का खुळी? अगं, असे पोट जाळून कधी देव भेटतो होय ग? चल झोपडीत आणि चार घास खाऊन घ्या. बरे वाटेल.' म्हातारी म्हणाली. 'नको आजीबाई, अगं आज माझ्या व्रताचा शेवटचा दिवस आहे. मी व्रतभंग कसा करू? मी जर उपवास मोडला, अन्नग्रहण केले, तर देव नाराज होईल. मला व्रताचे पुण्यही मिळणार नाही. सारे कष्ट, सारी पुण्याई वाया जाईल.'



चंद्रिका म्हणाली.

'बाई, तुझे पुण्य वाया जाऊ नये, असे तुला वाटते ना? मग असे कर, तुझे पुण्य तू मला दान कर. नाहीतर माझ्या हातून कधीच कसलाच जप, तप, पुण्यकर्म घडले नाही. मी पडले ही अशी पापी. तुझे पुण्य मला दे अन् मला पावन कर.' म्हातारी असे काही मागेल, अस चंद्रिकेला जराही वाटले नव्हते. पण तिने मनोमन विचार केला, 'उपवासाचे पुण्य तर आपल्याला मिळेलच, व त्या पुण्याचेही दान केले तर काय अधिकस्य अधिक फलम.'

तिने स्वतःला सावरले. उभी राहिली. तिने म्हातारीच्या जवळचा पाण्याचा तांब्या हातात घेतला. हातात पाणी घेतले आणि 'घे तुळसा घे, मी महिनाभर केलेल्या उपवासाच्या व्रताच्या पुण्याईतील एक दिवसाचे पुण्य मी तुला देते. पुरुषोत्तमच्या साक्षीने घे, हात पुढे कर.' असे म्हणून तिने ते पाणी त्या म्हातारीच्या हातावर सोडलऽ आणि त्याच क्षणी तिचे वार्धक्य क्षणात दूर झाले. एका नव्या तेजाने तिची काया उजळली. तोच आणखी एक आश्चर्य घडले. स्वर्गातून एक विमान घेऊन काही देवदूत धरणीवर आले. त्यांनी तुळसाला वंदन केले आणि तिला सन्मानपूर्वक त्या दिव्य विमानात बसवले. मग देवदूतांनी चंद्रिकेला नमस्कार करत म्हटले, की 'बाई, तुम्ही खरच पुण्यवान आहात. आज केवळ तुमच एक दिवसाचे पुण्य या तुळसाला दानात मिळाले आणि त्याच्या पुण्याईने तिचा उद्धार झाला. देवांनी तिला स्वर्गलोकात न्यायला विमान पाठवले. धन्य धन्य तुम्ही!'

तुळसाला घेऊन जाणाऱ्या त्या विमानाकडे पाहत असताना चंद्रीकेच्या मनात असा एक विचार येत होता, की 'माझ्या उपवासाच्या एक दिवसाच्या पुण्याईने तुळसा उद्धरली तर माझे काय. मी तर एक महिनाभर व्रत केले, उपवास केलेत आणि देवाचे नामस्मरण केले. तरीही मला मात्र न्यायला तसे देवाचे विमान का बरे आले नाही?' अनेकवेळा विचार करूनही चंद्रिकेला पटेल असे समाधानकारक उत्तर मिळालेच नाही. असेच चार-पाच अधिक मास आले अन गेले. पुढे जो अधिकमास आला त्यावेळी चंद्रिकेने तीर्थयात्रेचे पुण्य पदरी पडावे म्हणून काशी यात्रेला जाण्याचे ठरवले. त्यामागे काशीला जावे, गंगास्नान करावे, काशी विश्वेश्वराचे दर्शन घ्यावे आणि पुण्य जोडावे हा मानस होता.

एकदा ती काशी विश्वनाथाचे दर्शन घेऊन मंदिराबाहेर पडताच एक मुलगा समोर आला. त्याने चंद्रिकेला वाकून नमस्कार केला आणि म्हणाला, 'मला ओळखले का?' 'नाही बाळा, मी तुला ओळखले नाही. अरे कोण तू? तुझा आणि माझा संबंध काय?' भांबावलेल्या चंद्रिकेने त्याला विचारले. तेव्हा चंद्राबाईच्या डोळ्यात पाहत तो मुलगा बोलू लागला, 'चंद्राबाई, मीच मागच्या जन्मी तुम्ही दिलेल्या एका दिवसाच्या पुण्याइने उद्धरलेली तुमची मोलकरीण तुळसा.'

'काय? तू आणि तुळसा?' चंद्रिकेने विचारले. 'होय, मीच तुळसा. त्या जन्मी तुम्ही ते पुण्याच दान दिलत त्याच्या जोरावरच मी काही दिवस स्वर्गसुख उपभोगले आणि या जन्मी या पवित्र नगरीत मुलगा म्हणून जन्माला आलो. येथे येणाऱ्या लोकांना मी वाट दाखवतो.' 'बाळ, अरे मी इतके जप,तप केले, व्रत वैकल्य केले आहेत. आता तरी तु मला ईश्वराच्या भेटीची वाट दाखव रे' असे त्याला म्हणावे, असे वाटत असतानाच काशिनाथने हस्तसंकेत केला, त्या काशी विश्वनाथाकडे पाहत चंद्रिका कळवळून म्हणाली, 'देवा, तू काही मला न्यायला येत नाहीस ना? ठीक आहे. मग आता मीच तुझ्याकडे येते.' चंद्रिकेने काशी विश्वनाथला तेथूनच दंडवत घातला, तो शेवटचा. महान तपस्वी चंद्रिकेच्या स्मरणार्थ काशीनाथने तिथे एका शिवपिंडीची स्थापना केली. त्याने स्थापन केलेल्या त्या चंद्रेश्वराचे दर्शन घेतले आणि त्याची सेवा केली. अधिकमासातील उपवास, व्रताच्या पुण्याईने तुळसा, चंद्रिका आणि काशीनाथ यांचे कसे कल्याण झाले, ही कथा लक्ष्मीला सांगून विष्णू म्हणाले, 'देवी, अजून सुद्धा लोक मोठ्या आदराने आणि नितांत श्रद्धेने या चंद्रेश्वराच्या लिंगाचे दर्शन घेतात.'

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)